**कृपया प्रकाशनासाठी-** **4 डिसेंबर 2009**

**भाजपा सभासद मोहीमेत दहिसरकरांचा उत्साही प्रतिसाद**

**मुंबई, शुक्रवार** : भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्रात हाती घेतलेल्या सभासद मोहीमेत काल दहिसरमधील वॉर्ड क्र. 2 मध्ये जाहीर सदस्य नोंदणी करण्यासाठी आलेल्या माजी केंद्रिय मंत्री श्री. राम नाईक यांना दहिसरकरांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

संपूर्ण मुंबईतून पाच लाख नागरिकांना भारतीय जनता पार्टीचे सभासद नोंदविण्याचा संकल्प भाजपा मुंबईने केला आहे. या मोहीमेत उत्तर मुंबईतून एक लाख पंचवीस हजार सदस्य नोंदणी करण्यात येणार आहे. त्यासाठी उत्तर मुंबईच्या वॉर्डा-वॉर्डात जाऊन जाहीर सदस्य नोंदणी करायला भाजपा नेते श्री. राम नाईक यांनी काल दहिसर विधानसभेतील वॉर्ड क्र. 2 पासून प्रारंभ केला.

या जाहीर सदस्य नोंदणी कार्यक्रमाला नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. विशेषतः महिलांनी मोठ्या प्रमाणावर एकत्र येऊन भाजपाचे प्राथमिक सभासद स्विकारुन सा-यांनाच चकीत केले. "वाढत्या महागाईत घर चालविणे आम्हाला जिकरीचे होते आहे. या महागाई विरुध्द भाजपामार्फतच आम्ही आवाज उठवू शकू", असा विश्वासही आलेल्या महिलांनी श्री. राम नाईक यांच्याजवळ व्यक्त केला. अवघ्या दोन तासात श्री. राम नाईक व अन्य स्थानिक पदाधिका-यांनी 250 सभासद नोंदणी केली. भाजपा उत्तर मुंबईचे सरचिटणीस अॅड. जयप्रकाश मिश्र, दहिसर मंडळाचे अध्यक्ष श्री. श्रीकांत पांडे, चिटणीस श्री. जगदीश ओझा तसेच अॅड. रविंद्र कदम, सर्वश्री अशोक मिश्र, दीनबंधू यादव, जनार्दन दुबे, आदी स्थानिक पदाधिकारीही यावेळी सहभागी झाले होते.

**(कार्यालय सचिव)**